महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित

**लोकनेते व्यंकटराव हिरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय**

पंचवटी नाशिक - ४२२००३

पुणे विद्यापीठ संलग्न क्र पी.यू./एन.एस/ए.एस.सी/०१८(१९७१)

(NAAC Reaccredited at '**A**' Level with CGPA 3.01)

कार्यालय: २५१२९५४ , २६२८२३३ फैक्स ( २५३) २५१२९२४

Web site : www.lvhcollege.com * E-mail: lvhcollege@gmail.com,

उत्कृष्ट संलग्न महाविद्यालय पुरस्कार २०१७, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Founder



Karmaveer Bhausaheb Hiray

दिनांक: १३. ०२. २०१५

# ग्रंथालय विभाग वार्षिक अहवाल

"बहुजन हिताय बहुजन सुखाय" हे ब्रीद असलेली व बहुजनांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी कटीबध्द असलेली नाशिक जिल्ह्यातील अग्रगण्य संस्था म्हणजे महात्मा गांधी विद्यामंदिर होय. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक गरजा लक्षात घेऊन संस्कृतीविषयक विचार कसे प्रगल्भ होतील याकडे विशेष लक्ष दिले जाते. या सर्वांचा विचार करून महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग चैतन्यशिल आणि तेजस्वी ठेवण्याचा आम्ही सदैव प्रयत्न करत असतो. २१ व्या शतकाने ग्रंथालयापुढे फार मोठी आव्हाने उभी केली आहेत. माहिती तंत्रज्ञानातील विकास व माहितीचा विस्फोट यांना सामावून घेत ग्रंथालयांना टिकून रहायचे आहे व पुढे वाटचाल कारायची आहे. या दृष्टीकोनातून ग्रंथालय कसे सुसज्ज होईल याकडे जास्तीत जास्त लक्ष दिले जाते. त्यासाठी दर्जेदार वाचन साहित्य संदर्भग्रंथ, शब्दकोश, ज्ञानकोश, विविध स्पर्धा परीक्षेसाठी ऊपयुक्त ग्रंथ व नियतकालीके खरेदी केले जातात. गेल्या ४४ वर्षापासून ग्रंथालय ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या महाविद्यालय ग्रंथालयाचा वार्षिक अहवाल सादर करतांना आनंद होत आहे. स्थापनेपासून ते आज घडीला ग्रंथालयात खालील प्रमाणे ग्रंथसंख्या उपलब्ध आहे.

| अ. न. | विवरण | मागील ग्रंथाची संख्या | चालु वर्षातील वाढ | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | विकत घेतलेले ग्रंथ<br>१. वरिष्ठ विभाग<br>२. वरिष्ठ पी. बी. एफ.<br>३. कनिष्ठ विभाग<br>४. कनिष्ठ पी. बी. एफ.<br>५. व्यवसाय शिक्षण विभाग आणि इतर | <br>४३७०५<br>५३९५<br>१२९०७<br>४२८५<br>१०७०३ | <br>१४८२<br>५९८<br>१८<br>—<br>— | <br>४५१८७<br>५९९३<br>१२९२५<br>४२८५<br>१०७०३ |
| | **ग्रंथसंख्या** | **७६९९५** | **१९९०** | **७८९८५** |
| २ | प्रबध व लघुप्रबंध | ०४ | | ०४ |
| ३ | नियतकालिकांचे बाधीव खंड | ५५७ | | ५५७ |
| ४ | सीडी व डीव्हीडी | २३० | ३३ | २६३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **एकुण** | ७९१ | ३३ | ८२४ |
| ५ | **रददबातल ग्रंथसंख्या**<br>१. वरिष्ठ विभाग<br>२. वरिष्ठ पी. बी. एफ.<br>३. कनिष्ठ विभाग<br>४. कनिष्ठ पी. बी. एफ.<br>५. व्यवसाय शिक्षण विभाग | <br>४१६१<br>१४६८<br>३४९९<br>२८२४<br>०२ | <br>०००<br>०००<br>००००<br>००००<br>०००० | <br>४१६१<br>१४६८<br>३४९९<br>२८२४<br>०२ |
| ६ | इतर (बुक बॅन्क□गुणवत्ता विकास□कनिष्ठ एस अे. एफ. □वरिष्ठ एस अे. एफ. □एम. एस. डब्लु.□के. बी. एच. इंजि. □ व्यवसाय शिक्षण मार्गदर्शन कोर्स. ) | ६४५५ | ०००० | ६४५५ |
| | **एकुण** | १८४०९ | ०० | १८४०९ |
| **ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या ग्रंथाची संख्या** | | **५८५८६** | **१९९०** | **६०५७६** |
| ७ | नियतकलिके<br>१. वर्गणीतुन खरेदी केलेले<br>२. ई जरनल<br>३. ई बुक | <br>९०<br>२१००<br>५१००० | <br>३<br>३९००<br>४६००० | <br>१०२<br>६०००<br>९७००० |

**ग्रंथालयातील सभासद संख्या**

| अ. न. | ग्रंथालयातील सभासद संख्या | विद्यार्थी | शिक्षक | |
|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ विभाग (अनुदानित आणि विनाअनुदानित) | ३१४८ | ७३ | |
| २ | कनिष्ठ विभाग (अनुदानित आणि विनाअनुदानित) | १६०० | २८ | |
| ३ | व्यवसाय शिक्षण विभाग | २१४ | ७ | |
| ४ | शिक्षकेतर कर्मचारी | | ६३ | |
| | ग्रंथालयातील एकुण सभासद संख्या | ४९६२ | १७१ | **५१३३** |

**माहिती साक्षरतेचा उपक्रम :** सद्याचे युग माहिती तंत्रज्ञानाचे युग आाहे. मनुष्याच्या जीवनात माहितीला अनन्य साधारण महत्व आहे. आज ज्ञान विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे वाचन साहित्याची मोठया प्रमाणावर निर्मिती होत आहे. विद्यार्थ्याना आपल्या क्षेत्रातील नवीन ज्ञान प्राप्त करणे आवश्यक असते. त्यासाठी विद्यार्थी माहिती साक्षर असणे आवश्यक आहे. त्या उदेशाने महाविद्यालयचा विद्यार्थी माहिती साक्षर व्हावा यासाठी ग्रंथालयात फ्री इंटरनेट सेवा सुरू करण्यात आली.

**इंटरनेट सेवा :** ग्रंथालय विभागात १५ संगणकांसह इंटरनेट सुविधा असलेली सुसज्ज प्रयोगशाळा E-Resources च्या वापरासाठी लाभ घेतात. इंटरनेट सुविधाचा वापर दर दिवसाला ९० विद्यार्थी सेवेचा लाभ घेतात.

**पी.बी.एफ :** आर्थिक दृष्टया मागासलेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ग्रंथपेढी पी.बी.एफ. या योजने अंतर्गत १०९७५५.०० रू. किंमतीचे सुमारे ५९८ ग्रंथ खरेदी करण्यात आले. या योजनेतील ९२ विद्यार्थ्यांना पुस्तके वर्षभर घरी अभ्यासासाठी देण्यात आली.

**स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन क्रेंद्र** : महाविद्यालयाच्या ग्रंथलयाला शैक्षणिक वर्षात मा. आमदार श्री उत्तमरावजी ढिकले यांच्या कडून आमदार निधीतुन स्पर्धापरिक्षेची रू. १८१२५० रुपयाची ६२५ पुस्तके ग्रंथालयाला भेट मिळाली. भेट मिळालेल्या पुस्तकांचा उपयोग जे विद्यार्थी विविध स्पर्धा परिक्षेसाठी बसलेली होते. त्या विद्यार्थ्यानी वर्षभर लाभ घेतला.

**नियतकालिके :** विविध विषयांवरील ग्रंथसख्या हे जसे ग्रंथालयातील महत्वाचे अंग आहे.त्याच प्रमाणे नियतकालीके सुध्दा ग्रंथालयाचे महत्वाचे अंग आहे. नियतकालिके हा ताज्या माहितीचा प्रवाह असतो. त्यामध्ये अध्यावत माहिती मिळते. ही माहीती आमच्या विद्यार्थी व शिक्षकांना मिळावी म्हणून ग्रंथालयात वेगवेगळया विषयावरील राष्ट्रीय स्तरावरील इंग्रजी , मराठी, हिंदी भाषेतील एकूण ९९ नियतकालीके येतात. शैक्षणीक वर्षात ६००० ऑनलाईन ई जरनल्स आणि ९७००० ऑनलाईन ई बुक्स ही सेवा

शिक्षकांना ऊपलब्ध करून देण्यात आली. या करीता ई बुक्स ई जरनल्स व नियतकालिके इ. साठी रू. ८९००० एवढी वार्षिक वर्गणी पाठविली आहे.

**दैनिक :** शिक्षक व विद्यार्थ्यांना दररोजच्या घडामोडीची माहीती मिळावी या करीत मराठी, इंग्रजी, हिंदी भाषेतील २० दैनिक वर्तमानपेपर येतात त्यासाठी दरमहा रू. ३०००.०० एवढा खर्च केला जातो.

**झेराक्स सेवा :** संशोधक विद्यार्थी व कर्मचारी यांच्या मागणी नुसार ग्रंथ तसेच नियतकालिकांतील मजकुरांच्या छायाप्रती काढुन दिले जातात.

**कात्रण सेवा** : महाविद्यालयाचे प्रतिमा अधिक स्पष्ट होण्यासाठी महाविद्यालय ग्रंथालयाने विविध दैनिकांतून महाविद्यालयासंबंधी येणा्या बातम्यांचे कात्रण सर्वासाठी वाचावयास खुले ठेवलेले आहे.

**फेसबुक सेवाः** महाविद्यालयाचे प्रतिमा अधिक स्पष्ट होण्यासाठी महाविद्यालय ग्रंथालयाने विविध दैनिकांतून महाविद्यालयासंबंधी येणा्या बातम्यांचे कात्रण व विविध उपक्रमाची माहिती महाविद्यालयाच्या फेसबुक वर अपलोड करून सर्वासाठी वाचावयास खुले ठेवलेली आहे.

**आंतर ग्रंथालयीन देव घेवः** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व प्रध्यापकांना आपल्या विषयासंबंधी पुस्तक ग्रंथालयात ऊपलब्ध नसेल अशा वेळी खलील ग्रंथालयाचे सभासदत्व घेण्यात आलेले आहे.

१. डेलनेट ( डेव्हलोपिगं लायब्ररी नेटवर्क ) चे सभासद, दिल्ली.

२. महात्मा गांधी विद्यामंदिर फॉर्मसी महाविद्यालय, मुंबई आग्रारोड पंचवटी नाशिक सभासद (रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना ऊपयोगी)

३. महात्मा गांधी विद्यामंदिर मॅनेजमेंट इन्स्टिस्टयुट मुंबई , आग्रारोड पंचवटी नाशिक सभासद (वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना ऊपयोगी)

**ग्रंथालयाची सुरक्षितता** : यासाठी ग्रंथालया विभागातील पुस्तके, फर्निचर, आणि इतर ईलेक्टॉनिक्स साहित्याचा ६२००००० रू. लाखाचा (बासस्ट लाख रूपये) वीमासाठी वार्षिक प्रिमीयम ३००० रू खर्च करण्यात येतो.

**आभार :** महाविद्यालयाचे ग्रंथालय समृध्द व अद्ययावत करण्यासाठी संस्थेचे विश्‍वस्थ व अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी एस. जगदाळे ग्रंथालय समितीचे प्रमुख उपप्राचार्य डॉ. एन. बी पवार व सदस्य ग्रंथालयातील माझे सर्व सहकारी आणि विद्यार्थी यांच्या मार्गदर्शनामुळे व सहकार्यामुळेच ग्रंथालयाची प्रगती होत आहे. सर्वांचे आभार व्यक्त करतो.

ग्रंथालय विभाग प्रमुख

**महाविद्यालयाच्या पारिजात नियतकालिकास राज्यस्तरीय द्वितीय युवा पुरस्कार**



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे द्वितीय पुरस्कार खा. सुप्रिया सुळे व आमदार राजेशजी टोपे यांच्या हस्ते स्वीकारतांना महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. एस. पी. व्याळीज, प्रा. एस. पी पवार यांच्यासह आदी मान्यवर.

## मांन्यवराच्या ग्रंथालय विभागाला भेट



महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे विश्वस्त डॉ. अद्वय हिरे–पाटील यांची ग्रंथालय विभागाला भेट दिली. या प्रसंगी प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे, उपप्राचार्य प्रा. पी. डी. झाल्से.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बी.सी.यु.डी. चे संचालक डॉ. व्ही. बी. गायकवाड यांची ग्रंथालय विभागाला भेट या प्रसंगी. त्यांच्या समवेत प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे, उपप्राचार्य व वनस्पती शास्त्रा विभाग प्रमुख डॉ. नंदु पवार, मानशास्त्र विभाग प्रमुख व उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज, सुरगाणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देशमुख, रज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. कुणाल वाघ,ग्रंथपाल प्रा. एस. पी. व्याळीज यांच्या सह आदी मान्यवर.



**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या स्थानिक चौकशी समितीची महाविद्यालय ग्रंथालयास भेट नृत्य आणि नाटक विभागाचे प्रा. प्रवीण भोळे, प्रा. सौ. शुभांगी बाहुलीकर प्रा. परिमल ए. फडके यांच्या समवेत प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे, मानशास्त्र विभाग प्रमुख व उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज ग्रंथपाल प्रा. एस. पी. व्याळीज यांच्यासह आदि मांन्यवर.**



**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या स्थानिकचौकशी समितीची महाविद्यालय ग्रंथालयास भेट मराठी विभागप्रमुख डॉ. बाळासाहेब गूंजाळ, डॉ. व्ही.एफ. देसले. यांच्या समवेत प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे, मानशास्त्र विभाग प्रमुख व उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज मराठी विभाग प्रमुख डॉ. किरण पिंगळे ग्रंथपाल प्रा. एस. पी. व्याळीज**




**महाविद्यालच्या विद्यार्थ्यांना ग्रंथालय विभागाची माहिती व मार्गदर्शन करतांना ग्रंथपाल प्रा. एस. पी. व्याळीज**

## ग्रंथालय समिती

| | |
|---|---|
| १.प्राचार्य डॉ. बी.एस.जगदाळे | अध्यक्ष |
| २.उपप्राचार्य डॉ. एन. बी पवार | सभासद |
| ३.उपप्राचार्य डॉ.आर. पी भामरे | सभासद |

| | |
|---|---|
| ४. उपप्राचार्या डॉ. मृणाल भारद्वाज | सभासद |
| ४. प्रा. पी. एन. वरखेडे | सभासद |
| ५. डॉ. लीना सी. पांढरे | सभासद |
| ७. प्रा. सौ.एम.पी.पाटील | सभासद |
| ८. प्रा. एस.पी.व्याळीज | सचिव |

ग्रंथालय विभाग प्रमुख